भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ )

जा.क्र.२३५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३१/०३/२०१७

**१) अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २९/०३/२०१७ चे १३.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही आपले राहते घरी तिचा अल्पवयीन भाऊ यांचे सह हजर असता यातील आरोपी हा तंबाखु मागण्याच्या इरादयाने तिचे घरात येवुन तिचा हात पकडुन छातीला दाबुन तसेच तिच्याशी अश्लिल कृत्य करुन तिच्यावर अत्याचार करण्याची मागणी करुन लैगिक छळवणुक केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३५४ (अ)(१) भादवि. सहकलम लैगिंक अत्याचारा पासुन बालकांचे संरक्षण अधि. २०१२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहे. आरोपी अटक आहे.

**२) महीलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २९/०३/२०१७ चे १६.०० वा. दरम्यान यातील आरापीने फिर्यादी ही भांडे घासत असता तिचे घराचे मागे जाबुन अश्लिल कृत्य करुन तिच्यासमोर बसला फिर्यादी ही घाबरुन घरासमोरील छपरीत निघुन गेली तिच्या लज्जेस धोका निर्माण करुन तिला लज्जेस धोका निर्माण करुन तिचा विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३५४ (३),५०९ भादवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहे. आरोपी अटक आहे.

**३) शेतातील मोटार पंप मधील तांब्याची चोरी . :—**

दिनांक २९+३०/०३/२०१७ चे रात्रीच्या दरम्यान यातील फिर्यादी हेमंत देवलत भोंदे वय ५४ वर्ष, रा. अशोक नगर जवाहरनगर यांचे शेता लगत असलेल्या नाल्यावर लावलेली दिड एचपी टेस्मो कंपनीची मोटार पंप मधील तांबा किमंती २,०००/—रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने कुणी नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. शेंडे पोलीस स्टेशन जवाहर नगर हे करीत आहे.

**४) घरासमोरुन इंडीका व्हीस्टा गाडीची चोरी . :—**

दिनांक २९+३०/०३/२०१७ चे रात्रीच्या दरम्यान यातील फिर्यादी सुरेश खुशाल जगनाडे वय ४२ वर्ष, पेट्राल पंप ठाणा यांची घरा समोर खुल्या जागेत ठेवलेली पांढऱ्या रंगाची इंडीका व्हीस्टा गाडी क्र. एमएच ३१ ईए २६३२ किंमती २,००,०००/—रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने कुणी नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जनबंधु पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहे.

**५) संगनमत करुन रेती चोरून नेल्याचे गुन्हा नोंद :—**

दिनांक १८+१९/०३/२०१७ चे रात्रीच्या दरम्यान यातील फिर्यादी नरेशचंद्र दिनानाथ सिरसागर मंडळ अधिकारी मिटेवानी यांनी जप्तीची कारवाही केलेला ट्रक क्र. एमएच ३६ एफ ३०६८ यात ४.८९ ब्रास रेती किंमती ७,५००/—रु. ची कोतवाल यांचे सुप्रत नामावर दिलेला ट्रक चालक व मालकाने संगनमत करुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३७९,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहे.

**६) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :—**

दिनांक ३०/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. मोहाडी, कारधा, तुमसर, साकोली, लाखनी, पवनी व भंडारा येथे अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण १० गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १४१ लिटर हातभट्टी दारु किंमती+ सडवा मोहा + साहित्य किंमती ११०५० /—रु. व १२ लिटर ६० मिली लिटर देशी दारु किंमती ३,५६५/—रु. तसेच जुगारातुन २१६/—रु. चा माल असा एकुण १४,८३१/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.